**भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका,भिवंडी**

**विद्युत विभाग**

**विषय:- सन 2023-24 मंजूर अर्थसंकल्पातील विद्युत विभागाकरिता सन 2016-17 मधिल प्रलंबित कामांचे मंजुरी करिता निधीचे पुर्नियोजन करणेबाबतचा प्रस्ताव.**

**प्रस्तावना,**

महानगरपालिकेच्या सन 2023-24 च्या अर्थसंकल्पात स्पील ओव्हर कामांची देयके प्रदान करीता तरतुदीचे पुर्ननियोजन करणे कामी प्रस्ताव तयार करण्यात आलेला आहे.

सन 2016-17 या आर्थिक वर्षातील अर्थसंकल्पीय तरतुदी नुसार विद्युत विभागाकडून विविध विकास कामे करण्यात आली आहेत. सदर कामांपैकी काही कामांचे देयक प्रलंबित राहिल्याने त्याची तरतुद सन 2016-17 च्या अर्थसंकल्पात स्पील ओव्हर स्वरुपात करण्यात आली होती. मात्र त्यावेळी महानगरपालिकेची आर्थिक स्थिती बिकट स्वरुपाची असल्याने त्यावेळेचे आयुक्त सो. यांनी सदरची देयके विभागाने तयार करुन विभाग स्तरावर तारखे निहाय ठेवणे च मुख्य व लेखा वित्त् अधिकारी यांच्या संपर्कात राहून जस जसा कॅश प-लो तयार होईल त्याप्रमाणे देयके पुढील मंजुरी करता सादर करण्याचे आदेश जा.क्र.भिनिशमनपा/लेखा/214 दिनांक 22/03/2017 नुसार देण्यात आले होते. त्यामुळे विद्युत विभागाकडिल सन 2016-17 या आर्थिक वर्षात श्री गणपती उत्स्व, बतकम्मा, छटपूजा, महावीर जयंती, डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती, शिवजंयती व ईद साठी रोषणाई व इतर सणांनिमित्त्1 ते 5 प्रभाग निहाय मंजुर वार्षिक निविदेमार्फत केलेल्या कामांची अंतिम देयके एकत्रीत रक्कम रुपये 13,42,874/- विभाग स्तरावर मंजुरी करिता प्रलंबित आहेत.

त्यामुळे गेले 6-7 वर्षापासुन सदर देयकांकरीता अर्थसंकल्पात तरतुद न केल्याने विभाग स्तरावर प्रलंबित राहिलेली आहेत. सध्या महानगरपालिकेची आर्थिक स्थिती बिकट स्वरुपाची असल्याने वरिल परिच्छेदात नमुद केलेली रक्कम 13,42,874/-/- अदा करणेकामी तरतुद शिल्ल्क नसल्याने सन 2023-24 अर्थसंल्पात किमान 14 लाखांच्या निधीची पुर्ननियोजनाव्दारे इतर लेखा शिर्षातुन उपलब्ध करणे आवश्यक आहे. प्रलंबित देयक मिळणेकामी मे.सचिन मंडप डेकोरेटर्स,भिवंडी यांचे कडून दिनांक 08/08/2023 रोजी पत्र प्राप्त् झाले त्यानुसार मा.प्रशासक तथा आयुक्त यांच्या कडे प्रस्ताव सादर केला होता. त्यास मा. प्रशासक तथा आयुक्त् यांनी देयके मंजुर करणेकामी लेखाशिर्ष तरतुदी करणेकामी पुर्नविनियोजन प्रस्ताव सादर करणेस दिनांक 28/082023 रोजी मान्यता दिलेली आहे. महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता 1971 नुसार नमुना नं. 10 (Form No. 10) नियिक 30(3) तरतुदीच्या अधिन राहुन पुर्ननियोजन करिता प्रस्तावना सहित फॉर्म सादर करण्यात येत आहे.

| या शिर्षातून | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| अनुक्रमांक | प्रधान,गौण् व तपशीलवार शीर्ष् | बांधकाम विषयक सेवा वगैरे | मुळ अनुदान | आज तारखे पर्यंत खर्च | उपलब्ध शिल्लक | शेरा |
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 1 | त्रयस्थ संस्था तांत्रिक लेखा परिक्षक(फि अदा करणे) | त्रयस्थ लेखापरिक्षण करणे | 50 लाख | निरंक | 50 लाख | 14 लाख पुर्ननियोजन केल्यानंतर एकुण शिल्लक तरतुद 36 लाख |

| हया शिर्षात | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| प्रधान,गौण् व तपशीलवार शीर्ष् | बांधकाम विषयक सेवा वगैरे | मुळ अनुदान | आज तारखे पर्यंत खर्च | प्रस्तावित वाढीची रक्कम | शेरा |
| 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 |
| श्री गणपती उत्स्व, बतकम्मा, छटपूजा, महावीर जयंती, डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती, शिवजंयती व ईद साठी रोषणाई व इतर खर्च | नागरिकांना वरील सुविधा व सुरक्षाकामी सुविधा पुरविणे | 60 लाख | 60 लाख (वार्षिक निविदा) | 14 लाख | रु14 लाख पुर्ननियोजन केल्यानंतर एकुण तरतुद 74 लाख शिल्लक तरतुद 14 लाख |

महानगरपालिकेत सद्य:स्थितीत मा.महासभा व मा.स्थायी समिती अस्तित्वात नसल्याने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 452 (अ) नुसार मा.प्रशासक म्हणुन अधिकार मा.प्रशासक तथा आयुक्त् सो. यांचे असल्याने त्याअनुषंगाने सन 2023-2024 मंजुर अंर्थसकल्पातील विद्युत विभागाकरिता असलेल्या श्री गणपती उत्सव, बतकम्मा, छटपूजा, महावीर जयंती, डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती, शिवजंयती व ईद साठी रोषणाई व इतर खर्च कामाची देयके अदा करणे कामी खर्चाचे पुर्ननियोजन करणेस प्रस्तावित करण्यात येत आहे.

**ठराव** २८६ **दिनांक** ०९/११/२०२३

**विषय:- सन 2023-24 मंजूर अर्थसंकल्पातील विद्युत विभागाकरिता सन 2016-17 मधिल प्रलंबित कामांचे मंजुरी करिता निधीचे पुर्ननियोजन करणेबाबतचा प्रस्ताव.**

श्री गणपती उत्सव बतकम्मा, छटपूजा, महावीर जयंती, डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती, शिवजयंती व ईद साठी रोषणाई व इतर खर्च करणे कामी तरतुदींचे पुर्ननियोजन करणेकामी प्रशासकिय व आर्थिक मान्यता मिळणेबाबत प्रस्ताव प्र.कार्यकारी अभियंता (विद्युत), शहर अभियंता, मुख्या लेखा परिक्षक, मुख्य लेखा परिक्षक, मुख्य लेखा व वित्त् अधिकारी, अतिरीक्त् आयुक्त् यांनी केलेल्या शिफारशीसी नुसार नगरविकास विभागाकडिल शासन निर्णय क्रमांक एम.सी.ओ. -2020/प्र.क्र.71(भाग-2)नवी 14 दिनांक 6 जून 2022 अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम तरतुद व विषेशत: कलम 452 अ च्या (1 अ ) व (1 ब ) च्या तरतुदी नुसार मला प्राप्त् झालेल्या अधिकारानुसार श्री.अजय वैद्य प्रशासक विद्युत विभागाकडिल गणपती उत्स्व, बतकम्मा, छटपूजा, महावीर जयंती, डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती, शिवजंयती व ईद साठी रोषणाई व इतर खर्च या लेखाशिर्षात तरतुदींचे पुर्ननियोजन करण्यास मान्यता देत आहे.

**(अजय वैद्य)**
**प्रशासक तथा आयुक्त्**
**भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका,भिवंडी**